**विषय - निवडलेल्या ७ विकसकांना पाठवायची पत्रं" असा असेल.**

प्रिय पंच समिती सदस्य,

ठरल्या प्रमाणे आज मी आणि श्री सुवर्ण कांत ठाकोर आपल्या पुनर्निर्माण सल्लागारांना त्यांच्या ऑफिस मधे भेटलो आणि जी पत्रं आपल्याला आपण निवडलेल्या ७ विकासकांना पाठवायची आहेत त्याचा मजकूर नक्की केला.
आमच्या मीटिंग मधे खालील गोष्टी ठरविण्यात आल्या.

१. विकसकांनची पत्रं दोन भागात असतील. दोन्ही प्रकारच्या पत्रात त्यांच्या मागल्या महिन्यात केलेल्या प्रेझेन्टेशन करिता त्यांना धन्यवाद देण्यात येईल तसेच त्यांचे नाव शॉर्ट लिस्ट झाल्या चे त्यांना सांगण्यात येईल.
पहिले पत्रं हे कांसोरशियम प्रकारच्या विकसकांची साठी, त्यांची सगळी स्ट्रक्चरल माहिती घेण्या करिता, असेल. तर दुसरे पत्र ओनरशिप अगर पार्टनरशिप प्रकारच्या विकसकांसाठी त्यांची सगळी माहिती घेण्या करिता असेल.
ह्या पत्रांचा उद्धेष्य पुढे ज्याला कोणाला आपला प्रोजेक्ट देण्यात येईल, त्या वेळेस त्याच्या सोबत काम करताना आपल्याला पूर्ण स्पष्टता असावी आणि कामात कुठला ही त्रास होऊ नये असा आहे.
ही पत्रं ई मेल स्वरूपात उद्या सगळ्या शॉर्ट लिस्ट केलेल्या बिल्डर्स ला सल्लागारांतर्फे पाठविण्यात येतील. ह्याच पत्रांत विकसकांच्या प्रॉजेक्ट आणि ऑफिस विजिट चे ही विचारण्यात येणार आहे.

२. दुसऱ्या पत्रात, जे २० जानेवारी च्या सुमारास पाठवण्यात येईल, त्यात आपण विकसकांना त्यांनी आपल्या कमिटी आणि आमंत्रित यांच्या समोर जे प्रेझेन्टेशन फेब्रुवारीच्या अखेरीस करायचे आहे, त्या संबंधी सगळी माहिती असेल. ह्यात आपण विकसकांना आज असलेल्या संपूर्ण कॉलोनी च्या जागे ची, असलेल्या फ्लॅट्स ची, त्यांच्या कॉर्पोरेशन ड्रॉइंग प्रमाणे असलेल्या साइज ची आणि ह्या प्रोजेक्ट साठी आपली जी फर्म विश लिस्ट आहे त्याची माहिती देणार आहोत. त्यानुसार विकसक, आपण ठरवलेल्या दिवशी, मागील प्रमाणेच, त्याची techno commercial offer कमिटी, सल्लागार आणि निमंत्रित यांच्या समोर एका PPT presentation च्या स्वरूपात मांडेल. ह्यात त्याची revised offer आणि कॉलोनी चे पूर्ण डिझाईन व्हिजन असेल. ही सिल्ड ऑफर विकसक त्या प्रेझेन्टेशन च्या वेळेसच आपल्या सर्वांसमोर उघडेल.

पहिल्या दोन पत्रांचे ड्राफ्ट काबरा मेडम ने मला पाठवले पण त्यात काही दुरुस्ती करून ते परत पाठवायला मी त्यांना सांगितले आहे. ते ड्राफ्ट फायनल झाले की मी ते तुमच्या शी लगेच शेयर करेन.

**प्रदीप नेवाळकर**